## Daily Marathi Vocab 06 May 2024

**1. कानाडोळा**

**अर्थ:** लक्ष न देणे



- **समानार्थी शब्द:** दुर्लक्ष
- **विरुद्धार्थी शब्द:** लक्ष देणे
- **वाक्यात उपयोग:** रमेशच्या चुकांकडे त्याच्या वडिलांनी **कानाडोळा** केला.

**2. निपुण**

**अर्थ;** निष्णात



- **समानार्थी शब्द:** कुशल, प्रवीण
- **विरुद्धार्थी शब्द:** अकुशल, नवखा, अप्रवीण
- **वाक्यात उपयोग:** त्याच्या कामात तो **निपुण** होता.

**3. मंजुळ**
**अर्थ:** सुरेख आवाज



- **विरुद्धार्थी शब्द:** कर्कश
- **वाक्यात उपयोग:** रोज सकाळी मधु कोकिळेचा **मंजुळ**आवाज ऐकून उठत असे.

## Daily Marathi Vocab 07 May 2024

**1. संगर**

**अर्थ:** लढाई



- **समानार्थी शब्द:** युद्ध, रण
- **वाक्यात उपयोग:** दोन देशांमध्ये **संगर** सुरु आहे.

**2. लवण**

**अर्थ;** खारट



- **समानार्थी शब्द:** मीठ, क्षारयुक्त
- **विरुद्धार्थी शब्द:** गोड

- **वाक्यात उपयोग:** भाजीत **लवण** प्रमाणापेक्षा जास्त नसावे.

**3. अनुपम**

**अर्थ;** तुलना करता येणार नाही असे



- **समानार्थी शब्द:** अतुल्य, अतुलनीय
- **विरुद्धार्थी शब्द:** सामान्य
- **वाक्यात उपयोग:** ताजमहल ही एक **अनुपम** इमारत आहे.